**<u>सं.फौ.ख.क्र. १५२/२०२३</u>**
**<u>नि.क्र. १९</u>**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.०१ चा सरतपास–</u>**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – उध्दव त्रंबकराव जाधव,

वय – ६० वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – बामणी, ता. निलंगा, जि. लातूर.

**<u>फिर्यादी तर्फे साक्षीदाराचा सरतपास विधीज्ञ श्री. एच. व्ही गायकवाड यांचे मार्फत सुरुः–</u>**

१. माझ्या **नि.क्र.१९** मधील शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. आरोपीने मला बँक ऑफ महाराष्ट्र शाखा निलंगा येथील खात्यावरील धनादेश क्रमांक ८५२१५ हा रक्कम रुपये २,५०,०००/– करीता दिला होता. तो धनादेश मी **नि.क्र.२३** सोबत अनुक्रमांक ०१ ला दाखल केले आहे. त्यावर आरोपीची सही आहे. ती सही मी ओळखतो. त्यास **नि.क्र.२४** देण्यात आली.

२. **नि.क्र.२४** वरील धनादेश मी वटणेकरीता माझे खाते असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा निलंगा येथील खात्यावर भरला असता तो धनादेश सही मध्ये बदल असल्या कारणाने न वटता परत आला. धनादेश न वटता परत आल्याचा मेमो माझ्या बँकेने दिला होता. तो मेमो मी नि.क्र.०४ सोबत अनुकमांक ०२ ला दाखल केला आहे. त्या मेमोवर महाराष्ट्र ग्रामीण बॅक शाखा निलंगाचा शिक्का आहे . त्यास **नि.क्र.२५** देण्यात आली. त्यानंतर मी माझ्या वकीलांच्यामार्फत आरोपीला धनादेश अनादरीत झाल्याचे आणि धनादेशातील रक्कम पंधरा दिवसांमध्ये परत करण्याबाबत दिनांक ११.०३.२०२३ रोजी नोटीस पाठवून कळवले होते. त्या नोटीसची स्थळप्रत मी नि.क्र.०४ सोबत अनुकमांक ०३ वर दाखल केली आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याच्यावर माझ्या वकीलांची आणि माझी सही आहे. त्यास **नि.क्र.२६** देण्यात आली.

३. ती नोटीस पोस्टाने पाठविल्याबाबत पोस्टाची पावती मी नि.क्र.०४ सोबत अनुकमांक ०४ वर दाखल केली आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२७** देण्यात आली. ती नोटीस आरोपीने स्वीकारली होती. तसा पोस्टाचा अहवाल मी नि.क्र.०४ सोबत अनुकमांक ०५ वर दाखल केला आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर पोस्टाचा शिक्का व पोस्टमास्तरची सही आहे. त्यास **नि.क्र.२८** देण्यात आली.

**<u>उलटतपास करीता आरोपी व आरोपीच्या विधीज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर सबब उलटतपास नाही.</u>**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.06.04 17:41:10 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा.**
**जिल्हा लातूर.**
**(न्यायालय क्र.०१)**

**दिनांकः–०४/०६/२०२६.**
**ठिकाणः–निलंगा**